**<u>नियमित दरखास्त क्रमांक ११३/२०१८ मधील अर्ज</u>**
**<u>(निशाणी क्रमांक २९) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००२०४८-२०१८)

०१. प्रस्तुत अर्ज धनको यांनी कागदपत्रे दाखल करण्याकरीता परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे. ऋणकोंनी सदर अर्जास हरकत घेतलेली आहे. पुरावा गोळा करण्याकामी चुकीचे फोटोग्राफ दाखल केले असल्याने ते पुराव्याकामी घेण्यात येवून येत असे त्यांचे म्हणणे आहे.

०२. धनको व ऋणकोतर्फे वकिलांचे म्हणणे ऐकले. सदर दरखास्तीकामी धनको यांचा पुरावा चालु आहे. धनको यांनी स्वत: साक्षीदार म्हणून साक्ष दिलेली आहे. त्यांच्यातर्फे फोटोग्राफरची साक्ष नोंदविणे चालु आहे. त्याकरीता ते कागदपत्रे दाखल करु इच्छितात. सदर कागदपत्रे बरोबर आहेत का याचा निर्णय ते दाखल केल्याशिवाय होणे शक्य नाही. पूर्ण पुरावा देण्याकरीता धनको यांना संधी देणे आवश्यक आहे. ऋणको यांना उलटतपासाची संधी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

**<u>आ दे श</u>**

०१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
०२. कागदपत्र दाखल करण्यास धनकोस परवानगी आहे.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2022.08.10 17:06:17 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- १०.०८.२०२२.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.